N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रावेर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0017 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2022 16:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 22/11/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2021
**Time From (वेळेपासून):** 10:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/01/2022 **Time (वेळ):** 16:16 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2022 16:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** स्टेशन रोड,वन-परिक्षेत्र अधि शासकिय निवा, रावेर,रावेर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राधाकिसन पांडुरंग सोनवणे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | संत ज्ञानेश्वर नगर हुडको,औरंगाबाद,औरंगाबाद,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | संत ज्ञानेश्वर नगर हुडको,औरंगाबाद,औरंगाबाद,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकेश हरी महाजन | | | 1. वन-परि अधि शासकिय निवासस्थान , रावेर,रावेर,रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

रावेर पो स्टे भाग 6गुरनं./Cctnsनं.17/2022,भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988चे कलम 7प्रमाणे मुळ तक्रारदार व फिर्यादीचे नांव,पत्ताः- .श्री.राधाकिशन पांडुरंग सोनवणे वय-53व्यवसाय गव्ह.सिव्हील कन्ट्रक्टर रा.संत ज्ञानेश्वर नगर,हुडको,औरंगाबाद,जि.औरंगाबाद आरोपी लोकसेवक नांवः- मुकेश हरी महाजन वन-परिक्षेत्र अधिकारी ,वन परिक्षेत्र अधिकारी कार्याल्य,रावेर जि.जळगांव,मुळ रा.चुंचाळे ता.चोपडा,जि. जळगांव हल्ली मुक्काम शासकिय निवासस्थान स्टेशन रोड,रावेर,ता.रावेर गुन्हा घडला तारीख वेळ,ठिकाणः-दिनांक22/11/2021रोजी 14-04 ते 12-09वाजेच्या दरम्यान रावेर शहरातील वन परिक्षेत्र अधिकारी यांचे शासकिय निवासस्थान येथे लाचेची मागणी रक्कमःदिनांक22/11/2021रोजी प्रथम 1,30,000/-रुपये व तडजोडी अंती 1,15,000/-रुपये मागणी केली हस्तगत लाचेची रक्कमः- निरंकतपास अधिकारी ः-एस.एस.पाटील पोलीस उप-अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव गुन्ह्याची हकीगतः- वरील फिर्यादी यांनी जळगांव जिल्ह्यातील वन-विभाग खात्याकडुन रावेर तालुक्यातील पाल क.नं.55,लोहारा क.नं.24,जिन्सी क.नं.09या गावांमध्ये ए.एन.आर. रोपवन अंतर्गत चैनलिंग फेन्सींग व गेटच्या कामाचा ठेका घेतला होता. यातील फिर्यादी यांनी पाल येथील व त्यानंतर लोहारा येथील काम पुर्ण केले त्यापैकी फिर्यादी यांना पाल येथे केलेल्या कामाचा धनादेश मिळाला होता. तसेच लोहारा येथील कामाचा धनादेश मिळणे बाकी होते. सदरचा धनादेश मिळणेसाठी फिर्यादी यांनी आलोसे यांची भेट घेतली असता आलोसे यांनी फिर्यादीस मी तुम्हाला पाल येथे केलेल्या कामाचा धनादेश मिळवुन देण्यासाठी अनुकुल अहवाल पाठवुन मदत केलेली आहे. त्यासाठी तुम्ही 5टक्के प्रमाणे 1,30,000/-रुपये मला दया असे सांगुन आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडेस लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दिनांक 21/11/2021रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्याल्यात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती. सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव पथकाने पंच व साक्षीदार यांच्या समक्ष दिनांक 22/11/2021रोजी पळताळणी केली असता आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडेस पाल तालुका रावेर येथे केलेल्या वन-विभागाचे कामाचा धनादेश मिळणेसाठी अनुकुल अहवाल पाठवुन मदत केल्याचे मोबदल्यात 5 टक्के प्रमाणे प्रथम 1,30,000/- रुपये व तडजोडी अंती 1,15,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा वगैरे मजकुरची फिर्यादीची टंकलिखित केलेली प्रत सोबत जोडली आहे हजर केलेल्या सदर फिर्यादवरुन वरप्रमाणे गुन्हा रजिस्टरी दाखल करुन सदर गुन्ह्याचा तपास श्री.एस.एस पाटील पोलीस उप-अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव हे करीत आहेत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** shitalkumar jayvantrao naik
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** psi **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name (नाव):** [illegible]RE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN64412

पोलीस ठाणे अंमलदार
रावेर पो.स्टे

पोलीस स्टेशन, रावेर
जिल्हा-जळगांव

फिर्याद रावेर पोलीस स्टेशन जि.जळगांव

दि.१८.०१.२०२२

**मी राधाकिशन पांडुरंग सोनवणे, वय–५३ वर्षे, व्यवसाय–गव्हर्नमेंट सिव्हील कॉन्ट्रॅक्टर, रा.संत ज्ञानेश्वर नगर, हुडको, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि.२१.११.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात हजर राहुन पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस रावेर वन परिक्षेत्र कार्यालयाचे श्री.मुकेश महाजन, RFO यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार दिली ती खालील प्रमाणे

माझी औरंगाबाद येथे मेसर्स सोनवणे कंन्ट्रक्शन नावाची फर्म आहे. मी महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकिय कामांच्या निवीदा स्विकारुन काम करतो. सन–२०१९ मध्ये जळगांव जिल्हयातील वनविभाग खात्याकडुन ए.एन.आर रोपवन अंतर्गत चैनलिंक फॅन्सिंग व गेटच्या कामाच्या ऑनलाईन ई–निवीदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.सदर ई–निवीदा मी भरल्याने सदरच्या कामाचा ठेका मला मिळाला होता. त्याअंतर्गत ई–निवीदा क्र.०५/२०१९/२० नुसार (१)पाल क.नं.५५ (२) लोहारा क.नं.२४(३) जिन्सी क. नं.०९ या रावेर तालुक्यातील ०३ गावांमधील वनविभागाचे चैनलिंक फॅन्सिंग व गेटचे कामकाज करण्याचे आदेश मला मिळाले होते.

मी प्रथम पाल क.नं.५५ व लोहारा क.नं.२४ येथे काम सुरु करुन पाल येथील काम पुर्ण केले व त्यानंतर लोहारा क.नं. २४ चे काम पुर्ण केले. त्यापैकी मला पाल गांवी केलेल्या कामाचा २५,१६,४४६/–रुपये रकमेचा धनादेश मिळाला आहे. सदरचा धनादेश मला वनपरीक्षेत्रीय कार्यालय, रावेर येथुन सेंट्रल बॅक ऑफ इंडीया, शाखा रावेर या बॅकेचा मिळाला होता. सदर कामाची एम.बी.रावेर वनविभागाचे श्री.मुकेश महाजन, RFOयांनी तयार केली आहे. लोहारा क.नं.२४ या कामाचा २६,६१,६३९/–रुपये धनादेश मला मिळणे बाकी आहे.

दि.२८/१०/२०२१ रोजी रावेर वनविभागाचे कार्यालयात जावुन श्री.मुकेश महाजन, RFOयांची भेट घेवुन लोहारा क.नं.२४ या कामाचा धनादेश मिळणे बाबत विनंती केली असता त्यांनी मला सांगितले की, मी तुम्हाला पाल येथे केलेल्या कामाचा धनादेश मिळवुन देण्यासाठी अनुकूल अहवाल पाठवुन मदत केली आहे. त्यामुळे तुम्ही पाल येथे केलेल्या कामाची धनादेश रक्कम २५,१६,४४६/–रुपयांचे ५% प्रमाणे सुमारे १,३०,०००/–रु. रक्कम मला द्या, तरच मी तुमची लोहारा क.नं.२४ चा धनादेश मिळवुन देण्यासाठी अनुकूल अहवाल पाठवुन मदत करेल, नाहीतर मी सदर कामात मदत करणार नाही, असे सांगितले. त्यावर मी त्यांना सांगितले की, या कामात मला काही जास्त फायदा झालेला नाही. परंतु ते काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यावरुन माझी खात्री झाली की, श्री.मुकेश महाजन, RFO वन परिक्षेत्रीय कार्यालय, रावेर हे माझ्याकडे मी केलेल्या जळगांव जिल्हयातील पाल क.नं.५५ या कामाचा धनादेश देण्यास मदत केल्याचे सांगुन त्याच्या मोबदल्यात मला मिळालेल्या रक्कमेपैकी पाच टक्क्यांप्रमाणे १,३०,०००/–रुपये लाचेची मागणी करीत आहे. म्हणुन मी श्री.मुकेश महाजन, RFO यांना १,३०,०००/–रुपये लाच रक्कम देण्यास तयार आहे व मी नंतर येतो असे सांगितले. तेव्हा श्री.मुकेश महाजन, RFO यांनी मला त्यांचे शासकिय निवासस्थानी येवुन भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातुन निघुन आलो.

मला श्री.मुकेश महाजन, RFO यांना त्यांच्या मागणीप्रमाणे १,३०,०००/– रू.लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर त्यांना लाच रक्कम दिली नाही तर ते माझा लोहारा क.नं.२४ या कामाचे धनादेश मंजुर होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करतील किंवा त्रुट्या काढुन विनाकारण विलंब करतील. म्हणुन मी नाईलाजाने श्री.मुकेश महाजन,RFO यांना १,३०,०००/–रुपये लाचेची रक्कम देण्यास तयार झालो. श्री.मुकेश महाजन, RFO यांची भेट घेवुन लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी मी दि.२२.११.२०२१ रोजी त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे शासकिय निवासस्थानी जाणार आहे. सदर दिवशी मी सकाळी ०९.३० वा.माझे कारसह भुसावळ ते रावेर रोडवर रावेर शहराच्या अलिकडे २ कि.मी.अंतरावर बिजासनी माता मंदिराजवळ उपस्थित राहील बाबत तक्रार दिली होती.

दि.२२.११.२०२१ रोजी मी रावेर शहराच्या अलिकडे २ कि.मी.अंतरावर बिजासनी माता मंदिराजवळ माझे कार सह उपस्थित होतो. तेव्हा श्री.पाटील साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक एका खाजगी वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन मला पंच क्रं.१ यांचेसह माझे कारने श्री.मुकेश महाजन, त्थ यांची भेट घेण्यासाठी वन परिक्षेत्र अधिकारी निवासस्थान येथे पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे श्री.मुकेश महाजन यांचे शासकिय निवासस्थानी गेलो. तेव्हा पंच क्रं.१ यांना सदर शासकिय निवास्थानाच्या गेटवर डयुटीस असलेल्या व्यक्तीने शासकिय निवास्थानात येवु न देता गेटच्या बाहेरच थांबवुन ठेवले होते. त्यामुळे मी एकटा सदर शासकिय निवासस्थानाच्या आत जावुन श्री.मुकेश महाजन, RFO यांची भेट घेतली. तेव्हा श्री.मुकेश महाजन, RFO व माझेत मी केलेल्या कंत्राटी कामाबाबत व इतर चर्चा झाली. तेव्हा त्यांनी मला किती पेमेन्ट झाले तुमचे आता, असे विचारले असता, मी २६ लाख रुपये झाले, असे सांगितले. तेव्हा श्री.मुकेश महाजन, RFO यांनी मला सांगितले की, तुम्ही बोलले, मी तुम्हाला दहा हजार रुपये देणार नाही ते कबुल केले मी,एक तिस होत होते ना ते, दहा कमी द्या, अजुन पाच कमी देवुन टाकतो, एक पंधरा देवुन टाका, असे सांगितले. तेव्हा मी माझे उजव्या हाताचे एक बोट दाखवुन एक लाख राउंड फिगर आहे ना, असे सांगितले असता श्री.मुकेश महाजन, RFO यांनी मी काही तुम्हाला जास्त सांगितले नाही, भलेही नंतर द्या, असे सांगुन माझे कडे १,१५,०००/–रु. लाच मागणी केली. तेव्हा मी त्यांना गुरुवारी येतो असे सांगुन निघुन आलो होतो.

मी दि.२५.११.२०२१ रोजी रावेर शहराच्या अलिकडे २ कि.मी.अंतरावर बिजासनी माता मंदिराजवळ माझे कार सह उपस्थीत होतो. तेव्हा श्री.पाटील साहेब हे पंच व सापळा पथकासह सदर ठिकाणी आले. तेव्हा मी १,१५,०००/–रु. त्यात **(२००० रु.दराच्या २९ नोटा, ५०० रु.दराच्या ११४ नोटा** ) श्री.पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले.तेव्हा सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन अ.पा.लावलेल्या नोटांचे बंडल माझे पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिश्यात ठेवुन दिले होते.

त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी मला व पंच कं.१ अशांना थोडक्यात सुचना देवुन मला पंच कं.१ यांचेसह श्री.मुकेश महाजन यांना लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांचे शासकीय निवासस्थानी पाठविले होते. त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर निवासस्थानात गेलो. त्यावेळी माझेत व श्री.मुकेश महाजन यांचेत समक्ष भेट झाली. तेव्हा श्री.मुकेश महाजन यांनी पंच क्र.०१ यांचे कडे हाताचे बोट दाखवुन हे कोण आहेत, असे विचारले. तेव्हा मी ते आपले गाडीचे ड्रायव्हर आहेत, असे सांगितले असता श्री. मुकेश महाजन यांनी पंच क्र.०१ यांना हातातल्या बॅग सह बाहेर जाण्यास सांगितले. तेव्हा पंच क्र.०१ हे बाहेर निघुन गेले. त्यानंतर माझेत व श्री.मुकेश महाजन यांचेत माझे मुला बाबत तसेच पेंन्डींग पेमेंन्टचे कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात असलेली १,१५,०००/–रु. लाच रक्कम उजव्या हाताने बाहेर काढून ती लाच रक्कम श्री.मुकेश महाजन, RFO यांना देवु केली असता त्यांनी उजव्या हाताच्या इशा–याने सध्या तुमच्या जवळ राहु द्या असे इशारा करुन सांगितले.

त्यानंतर श्री.मुकेश महाजन यांनी मला त्यांचे हुंदाई कंपनीचे क्रेटा कार मध्ये बसण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांचे कार मध्ये बसलो. त्यानंतर सदर कार चालकाने कार सुरु केली. त्यानंतर कार सदर निवासस्थानाच्या बाहेर निघुन रस्त्याने जावु लागली. तेव्हा माझेत व श्री.मुकेश महाजन यांचेत पुन्हा चर्चा झाली. त्यानंतर साईड पाहण्यासाठी एका ठिकाणी कार थांबली. त्यानंतर पुन्हा सदरची कार रस्त्याने जात असतांना श्री.मुकेश महाजन यांनी मला तुम्ही आता किती आणले आहेत? असे विचारले असता मी १,१५,०००/–रु. आणले असल्याचे सांगितले व सदर लाच रक्कम माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यातुन बाहेर काढून श्री.मुकेश महाजन यांना देवु केली असता त्यांनी उजव्या हाताच्या इशा–याने सध्या तुमच्या जवळ राहु द्या, असे इशारा करुन सांगितले. त्यानंतर श्री.मुकेश महाजन यांनी सदरची कार थांबविली.

तेव्हा श्री.मुकेश महाजन यांनी मला समोर असलेल्या एका गॅरेज कडे बोट दाखवुन दादा यांच्या कडनं कागद घेता का एक, असे सांगितले. तेव्हा मी सदर कारच्या खाली उतरलो. तेव्हा मी सदर गॅरेज कडे जावु लागलो तेवढयात श्री.मुकेश महाजन हे त्यांचे कार व चालकासह सदर ठिकाणाहुन वेगाने निघुन गेले. त्यामुळे मी त्याच ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर सापळा पथकाचे खाजगी वाहन मला दिसले तेव्हा मी सापळा पथकास कोणत्याही प्रकारचा ईशारा न करता सापळा पथकाजवळ आलो. व घडलेली हकीकत सांगितली.

त्यानंतर मी श्री.पाटील साहेब यांना पंचासमक्ष कळविले की, श्री.मुकेश महाजन यांना माझे हालचालीवरुन माझे विषयी संशय आल्याने त्यांनी माझे कडून लाचेची रक्कम घेण्यास टाळाटाळ केली आहे. तसेच श्री.मुकेश महाजन यांचा माझे वरील संशय बळावल्याने त्यांनी पंच क्र.०१ यांना माझे सोबत राहु न देता. निवासस्थानाच्या बाहेर काढून दिले व मला एकटयाला त्यांचे कार मध्ये साईड पाहण्याच्या निम्मीताने त्यांचे कार मध्ये घेवुन जावुन मला रस्त्यात उतरवुन कारने वेगात निघुन गेले. माझा मुलगा सागर याने माहीती अधिकार कायद्यांन्वये वन परीक्षेत्र, रावेर या कार्यक्षेत्रात झालेल्या कामांची माहीती मिळणे बाबत अर्ज सादर केलेला असल्याने त्यांची देखील त्यांना भिती वाटून संशय आला असावा अथवा मी एका हाताने अपंग असलेल्या श्री.शंकर चव्हाण यांचे सोबत कायम राहतो हे श्री.मुकेश महाजन, RFO यांना माहीत असल्याने व श्री.मुकेश महाजन, RFO यांना श्री.शंकर चव्हाण यांचे विषयी मनात व्देष असल्याने त्याबाबत सुध्दा श्री.मुकेश महाजन, RFO यांना संशय आलेला असावा म्हणुन त्यांनी आज रोजी माझे कडून ठरल्याप्रमाणे लाच रक्कम घेतली नसावी बाबत सांगितले. तसा माझा सविस्तर जबाब नोंदविला आहे. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी सदर लाचेची रक्कम ताब्यात घेतली होती. सदरची रक्कम मला दि.०४.०१.२०२२ रोजी परत करण्यात आली आहे.

तरी श्री.मुकेश हरी महाजन, RFO, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, रावेर जि.जळगांव मुळ रा.चुंचाळे ता.चोपडा जि. जळगांव यांनी दि.२२.११.२०२१ रोजी १०.०४ ते १२.०९ वा.चे दरम्यान रावेर शहरातील वन परिक्षेत्र अधिकारी यांचे शासकीय निवासस्थान येथे पंचासमक्ष माझेकडेस मी पाल ता.रावेर येथे केलेल्या वन विभागाचे कामाचा धनादेश मिळणेसाठी अनुकूल अहवाल पाठवुन मदत केल्याच्या मोबदल्यात ५% प्रमाणे तडजोडीअंती १,१५,०००/– रुपये लाचेची मागणी केली.अशा प्रकारे श्री.मुकेश महाजन, RFO यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन माझेकडेस गैरमार्गाने १,१५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन वेळोवळी सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला.म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी स्वत: वाचुन पाहीली सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे लॅपटॉप संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

18.1.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

फिर्याद देणा–याची सही